# विद्यापीठातील कामकाजाला गती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सर्वच अधिविभागांसह महाविद्यालयातील १५ टक्के कर्मचारी सोमवारी कामावर रूजू झाल्याने कार्यालयीन कामकाजाला गती आली आहे. तब्बल तीन महिन्याच्या विश्रांतीनंतर कामावर रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांनी नव्या जोमाने कामाचा निपटारा केला. अस्थापना, नॅक मूल्यांकन, पगारपत्रक, पदवी व पदव्युत्तर विभाग आदी विभागातील कर्मचाऱ्यांनी आपआपले कामकाज सुरू केले आहे.

# विद्यापीठात राष्ट्रीय वेबिनारला आज प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्रविद्या व मास कम्युनिकेशन विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ जूनपासून राष्ट्रीय वेबिनारला प्रारंभ होणार आहे.

वेबिनारमध्ये वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे डॉ. राजन पाटील, युनिसेफ महाराष्ट्रच्या प्रमुख राजेश्वरी चंद्रशेखर, डॉ. स्वाती मोहपात्रा, प्रा. जे. एफ. पाटील, प्रा. जय सामंत, प्रा. राजेंद्र पारिजात, डॉ. राधेश्याम जाधव, प्रा. विजय ककडे, प्रा. मार्टिन म्यॅथ्यू, युनिसेफ महाराष्ट्रचे डॉ. खाणिंद्र भुयान, डॉ. राजलक्ष्मी नायर आदी संवाद साधणार आहेत, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ कुलगुरू निवड प्रक्रियेस गती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ नवीन कुलगुरू निवड अर्ज प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. इच्छुकांकडून अर्ज दाखल केले जात असून प्रक्रियेस गती आली आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत १७ जून रोजी संपत आहे. त्या पार्श्वभूमीवर नव्या कुलगुरूंच्या निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. २ जुलैअखेर अर्जप्रक्रिया सुरू राहणार आहे. राज्य विद्यापीठाच्या अधिनियमानुसार ही निवड केली जाणार आहे. यासाठी तीन सदस्यीय निवड समिती तयार करण्यात आली आहे.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक डॉ.



शिवाजी विद्यापीठातून...

अश्विनीकुमार नांगिया, संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) जी. सतीश रेड्डी, 'म्हाडा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हैसकर यांचा समावेश आहे. कुलगुरू व प्र-कुलगुरू यांचा कार्यकाल एकाचवेळी संपत असल्याने कुलगुरूपदाचा कार्यभार कोणाकडे जाणार, याबाबत उत्सुकता लागून राहिली आहे.

पुढारी

# सोशल डिस्टन्सिंगचे पालन करीत विद्यापीठात प्रशासकीय कामकाज

## मुख्य प्रवेशद्वाराजवळ तपासणी; मास्क, सॅनिटायजर बंधनकारक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना संकटाच्या काळात अत्यावश्यक सेवांसह १५ टक्के कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालये व अधिविभागात आवश्यकतेनुसार सोमवारपासून कामकाज सुरु झाले आहे. कोरोनाचा प्रार्दुभाव होऊ नये, यासाठी शासन नियमांचे काटेकोर पालन केले जात असून कर्मचाऱ्यांना मास्क, सॅनिटायजरचा वापर करणे बंधनकारक केले आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ कार्यालयात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची थर्मल स्कॅनिंगद्वारे तपासणी करताना सुरक्षारक्षक.**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार, जिल्हाधिकाऱ्यांकडून सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात आली आहेत. त्याअनुषंगाने विद्यापीठातील अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग वगळता अन्य विभागातील शिक्षकेतर, अधिकारी व सेवकांपैकी १५ टक्के याप्रमाणे अधिकारी व सेवकांना रोटेशननुसार कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाजास प्रारंभ झाला आहे. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशव्दाराजवळ कार्यालयात येणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांसह अन्य नागरिकांचे थर्मल स्कॅनिंग मीटरव्दारे तपासणी केली जात आहे. याठिकाणी सॅनिटायजर स्टँड लावण्यात आले आहे. येणाऱ्या प्रत्येकाची नोंद करण्याच्या सूचना सुरक्षा रक्षकांना देण्यात आल्या आहेत. बऱ्याच दिवसांनंतर कामकाज सुरु झाल्याने प्रशासकीय कामांना गती मिळाली आहे.